स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२५—२६/२९१ दि. १९/०९/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : ‘हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र’ मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेबाबत...

संदर्भ : मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, महाराष्ट्र शासन यांचे रासेयो—२०२५/प्र.क्र.७९/ई—१२९३२०६/रासेयो कक्ष,दि. १९ सप्टेंबर, २०२५ रोजीचे पत्र

महोदय,

मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रानुसार ‘हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र’ मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागासाठी ५ लक्ष वृक्ष लागवडीचे लक्ष्य देण्यात आले आहे.

तरी वृक्ष लागवडीचे लक्ष्य व त्याचे गांभिर्य लक्षात घेता आपल्या महाविद्यालयामार्फत किमान १५० वृक्षांची लागवड करावी. सदर उपक्रम आपल्या स्तरावर अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात यावा. तसेच वृक्ष लागवडीची स्थळ नोंदणी/जिओ टॅगिंग इत्यादि मुलभूत माहिती “अमृतवृक्ष” या मोबाईल ॲपद्वारे जमा(Install) करण्यात यावी. (“अमृतवृक्ष” ॲपबाबतची कार्यपध्दती सोबत जोडली आहे.) सदर मोबाईल ॲपवर लॉगिन करताना उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा उल्लेख करण्यात यावा. आपण वृक्ष लागवड केलेल्या वृक्षाचे नाव व त्या वृक्षाबरोबरचा एक फोटो “अमृतवृक्ष” ॲपवर अपलोड करण्यात यावा. सदरील वृक्ष लागवडीचे फोटो उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रोफाईल वर जातील याबाबतची सर्वांनी दक्षता घ्यावी. सदर उपक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. त्यानुसार आपण अनिवार्यता कार्यवाही करावी. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबतः मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

**क्रमांक: संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७९/ई-१२९३२०६/रासेयो कक्ष,** **दिनांक: १९ सप्टेंबर,२०२५.**

**प्रति,**

**सर्व कृषि व अकृषि विद्यापीठे/संचालनालये/अभिमत विद्यापीठे,**
**महाराष्ट्र राज्य.**

**विषय:-"हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेबाबत...**

**संदर्भ**: शासन समक्रमांकाचे पत्र दिनांक २८ ऑगस्ट, २०२५.

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये "हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत सन २०२५ या वर्षाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागासाठी राज्यात ५ लक्ष वृक्ष लागवडीच्या अनुषंगाने सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर वृक्ष लागवड करण्याबाबतच्या उपक्रमाचे उद्दिष्ट दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण होणे आवश्यक असून, त्यास आता केवळ १० दिवसांचा कालावधी शिल्लक राहिलेला आहे. त्यानुसार, सदर उद्दिष्ट साध्य करण्याकरिता सदर मोहिम अधिक प्रभावीपणे मिशन मोडवर राबविणे अत्यंत गरजेचे आहे.

**२.** यास अनुसरून नमूद करण्यात येते की, "हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेच्या अनुषंगाने आपल्या विभागाला ठरवून दिलेल्या ५ लक्ष वृक्ष लागवडीचे लक्ष्य व त्याचे गांभिर्य लक्षात घेवून, प्रत्येक कृषि व अकृषि विद्यापीठे, संचालनालये, अभिमत विद्यापीठे या अंतर्गत असलेले महाविद्यालये यांनी (संस्थानिहाय) किमान १५० वृक्षांची लागवड करावी. सदर उपक्रम आपल्या स्तरावर अत्यंत प्रभावीपणे राबविण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी व रोपे लागवडीची स्थळ नोंदणी/ जिओ टॅगिंग इत्यादि मुलभूत माहिती "**अमृतवृक्ष**" या मोबाईल ॲपव्दारे इंन्स्टॉल (Install) करण्यात यावा (अमृतवृक्ष ॲपबाबतची कार्यपध्दती सोबत जोडली आहे). सदर मोबाईल ॲपवर लॉगिन करतांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा उल्लेख करण्यात यावा. याप्रमाणे आपणांस कार्यवाही करावयाची आहे. प्रत्येक वृक्ष लागवडीचे फोटो घेणे अपेक्षित नाही. तथापि, आपणाकडून लागवड केलेल्या वृक्षाचे नाव व तिथे राहून एक फोटो काढणे अनिवार्य आहे. व तो फोटो अमृतवृक्ष ॲपवर अपलोड करण्यात यावा. सदरील वृक्ष लागवडीचे फोटो अपलोड करीत असतांना ते फोटो उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रोफाईल वर जातील, याबाबत सर्वांनी दक्षता घ्यावी.

सोबत:- वरीलप्रमाणे

आपला,

(डॉ.मिलिंद काळे)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव सादर:-**

१. मा.अपर मुख्य सचिव यांचे स्वीय्य सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. उप सचिव (समन्वय), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
३. निवडनस्ती- रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई- ४००००१.

# “हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र” अंतर्गत 10 कोटी वृक्ष लागवड मोहिम

- राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी “हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र” या अभियानाअंतर्गत वर्ष 2025 करीता 10 कोटी वृक्ष लागवड मोहिम महाराष्ट्र शासनाने राबविण्याबाबत ठरविलेले आहे.

- महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्रमांक सावभि-2025/प्र.क्र.28/फ-11 दिनांक 11जून 2025 अन्वये एकूण 25 विभाग/ प्राधिकरण यांना वृक्ष लागवडीचे उद्दिष्टे वाटप करण्यात आलेली आहेत.

- सदर मोहिमेचे संनियंत्रण करण्यासंदर्भात रोपे लागवडीची स्थळ नोंदणी/ जिओ-टॅगिंग इत्यादी मुलभूत माहिती अपलोड करण्याची सुविधा वनविभागाद्वारे विकसित करण्यात आलेल्या **“अमृतवृक्ष“** या मोबाईल ॲप द्वारे वापरकर्त्या विभागास उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

- तसेच शासनाने कळविल्यानुसार प्रत्येक लागवडीचे स्थळ व लावलेल्या रोपांचे पुरावे म्हणून त्यांचे Geo-taged फोटो व रोपांची संख्या **अमृतवृक्ष मोबाईल** ॲपद्वारे अपलोड करावयाची आहे. तसेच सदर रोपवनाची प्रत्येक वर्षी (माहे मे व ऑक्टोबर मध्ये) जीवंत रोपांची टक्केवारी **अमृतवृक्ष मोबाईल** ॲपद्वारेच Upload  करावयाची आहे.

# शासकीय/खाजगी विभाग

- अमृतवृक्ष मोबाईल ॲप ही Google Play Store वरुन Download करुन Install करावी.
- त्यानंतर **<u>नवीन</u> युजर्स/नोंदणी करा** या बटणावर क्लिक करावे.



- नवीन युजर्स वर क्लिक केल्यानंतर नोंदणी /Registration चे पर्याय उघडेल.
- वापरकर्ता प्रकार मध्ये **Government/Private Agency** निवड करावी..
- त्यानंतर Dropdown मधून आपले विभागाचे नांव निवडावे.
- त्यानंतर मोबाईल क्रमांक प्रविष्ट करुन नोंदणी करावी..




- नोंदणी झाल्यानंतर DASHBOARD वरील **वृक्ष स्थान (Plantation Location)** या बटनावर क्लिक करावे.

- त्यानंतर “10 **कोटी वृक्ष लागवड** (2025 **पावसाळा**)” या बटणावर क्लिक करावे.


- या योजनेमध्ये समोर जावयाचे नसल्यास **Close** या बटणावर क्लिक करावे.



- त्यानंतर **वृक्ष स्थान (Plantation Location)** यामध्ये झाडाचे नाव निवडून लावण्यात येणाऱ्या झाडांची योग्य संख्या भरावी.



- झाडांचे नाव व लावण्यात येणाऱ्या झाडांची योग्य संख्या भरल्यानंतर “**<u>स्थान निश्चित करा</u>**” या बटणावर क्लिक करावे. स्थान निश्चितीची अचूकता ही **<u>20 मीटर</u>** पेक्षा कमी असावी.
- त्यानंतर Geo-Tagg फोटो साठी **<u>कॅमेरा आयकॉन</u>** वरती क्लिक करुन रोपवनाचे फोटो घ्यावे.
- फोटो काढतेवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून फोटो काढावे.



- फोटो घेतल्यानंतर **पाठवा /SUBMIT** या बटनावर क्लिक करावे.
- माहिती पाठविल्यानंतर “Plantation location mapped successfully” असा संदेश आल्यानंतर आपली माहिती Server वर नोंदविण्यात आली आहे, याची खात्री होईल.

